PIFF

*10th Pune International Film Festival 2012*

DATE- १६ जानेवारी २०१२

# बालगंधर्व

कोणतीही परंपरा टिकवायची असेल तर त्यांची पुनरावृत्ती व्हायला हवी. पण आपल्याकडे जसं चित्रपटसंगीत काळानुसार बदलत गेलं तसं नाट्यसंगीताचं झालं नाही. त्यामुळेच बहुदा आजची तरुणाई नाट्यसंगीतापासून दूर गेली होती. मात्र बालगंधर्व चित्रपटाची सर्वच गाणी विशेषतः तरुण वर्गात लोकप्रिय झाली. एवढेच नाही तर नाट्यसंगीत हा या तरुणांचा गप्पांचा विषय झाला. त्यामुळे केलेल्या कष्टांचं चीज झाल्यासारखं वाटलं, अशी प्रतिक्रिया बालगंधर्व चित्रपटाचे संगीत दिग्दर्शक कौशल इनामदार यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी गायक आनंद भाटे उपस्थित होते.

पुणे फिल्म फेस्टीवलमध्ये उत्कृष्ठ मराठी चित्रपटांच्या स्पर्धेत बालगंधर्व या चित्रपटाला नामांकन मिळाले आहे. त्यानिमित्त या चित्रपटाच्या संगीताविषयी चर्चा झाली. कौशल इनामदार म्हणाले की, बालगंधर्वचं संगीत करणं हे आव्हान होतं. बालगंधर्वांची कारकीर्द म्हणजे एक चमत्कार होता. तसेच आजच्या तरुण वर्गाला आपलसं वाटेल, भावेल असं संगीत आम्हाला द्यायचं होतं. म्हणूनच हे एक आव्हानात्मक काम होतं. या चित्रपटाचे गायक आनंद भट यांनी सांगितले की, बालगंधर्व चित्रपटाचा एक भाग असल्याचा विशेष आनंद होत आहे.

अण्णांचे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन हा संपूर्ण देशासाठी मुख्य चर्चेचा विषय झाला होता. याच ज्वलंत विषयाच्या आधारे एक चित्रपट बनवण्याचे आव्हान सुमित्रा भावे व सुनील सुकथनकर यांनी पेलले आहे. हा चित्रपट पुणे आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टीवलमध्ये अंतर्भूत करण्यात आला आहे. त्याविषयी या हा भारत माझा च्या टीमने या चित्रपटाच्या निर्मितीविषयी आपल्या भावना पत्रकार परिषदेत मांडल्या.

यावेळी सुमित्रा भावे म्हणाल्या की, या देशाचा नागरिक म्हणून अण्णांच्या आंदोलनाचा धागा पकडून एखादा चित्रपट करावा असे वाटले. या चित्रपटात एका कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यामध्ये या आंदोलनाच्या दरम्यान काय बदल होत जातात याचे चित्रण केले गेले आहे.

या चित्रपटाला प्रेक्षकांचाही चांगला प्रतिसाद लाभला आहे.

आपला स्नेहांकित,

प्रवीण प्र. वाळिंबे

प्रवीण प्र. वाळिंबे
मीडिया को-ऑर्डिनेटर
९८२२४५४२३४ / ९४०५०३५४५८

Pune Marathon Bhavan, Near Mitra Mandal Colony, Opp. Parvati P. O.,
Pune - 411009, India. Tel: +91 20 24424545, Fax: +91 20 24428788,
Email: piff.india@gmail.com Website: www.puneinternationalfilmfestival.com
R. No. : F - 24914 / Pune S/R. No. : MAH / 1325 / 2009 / Pune

ORGANIZED BY
Pune Film Foundation

JOINTLY WITH
सत्यमेव जयते
Government of Maharashtra